DAILY: SAKAL, 19/08/2010, NASHIK



# महापालिका तयार करणार शहर स्वच्छता आराखडा

## 'जीटीझेड'च्या प्रकल्पांतर्गत कृतिदलाची स्थापना; सप्टेंबरमध्ये शासनाला देणार अहवाल

नाशिक, ता. १८ : राष्ट्रीय नागरी स्वच्छता धोरणांतर्गत नाशिक महापालिकेतर्फे शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यात येणार असून, येत्या सप्टेंबरमध्ये तो शासनाला सादर करण्यात येणार आहे. त्यासाठी आज विविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्यांचे कृतिदल स्थापन करण्यात आले आहे. महापौर नयना घोलप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत कृतिदलाची औपचारिक स्थापना झाल्याची घोषणा आयुक्तांनी केली.

### गोदा प्रदूषणावरही तोडगा काढणार

शहरातील कचरा, त्यावरील प्रक्रिया, पाणी, त्यातील गळती, झोपडपट्टीची स्थिती, तेथील शौचालयांची व्यवस्था याची माहिती संस्थेने सादर केली. नाशिक शहरातील ६५ झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण करून तेथील अशा प्रकारच्या पायाभूत सुविधांची माहितीही त्यांनी सादर केली. महत्त्वाचे म्हणजे आराखड्यांतर्गत गोदावरी आणि नासर्डीच्या प्रदूषणाच्या विषयावर अभ्यास करून काही काम करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय नागरी स्वच्छता धोरणांतर्गत जीटीझेड या जर्मन कंपनीने याच अंतर्गत देशातील सहा शहरांत स्वच्छतेसाठी पायाभूत आराखडा तयार करण्याचे ठरविले आहे. नाशिकमध्ये आयएमएसीएस कंपनीची सल्लागार म्हणून 'जीटीझेड'ने नियुक्ती केली असून, या कंपनीने नाशिकचे प्राथमिक सर्वेक्षण सुरू केले आहे. या प्रकल्पात नाशिकमधील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे कृतिदल स्थापन करण्याची तरतूद असून, या दलाने आराखड्यासाठी सहाय्य करून मान्यता दिल्यानंतर तो महासभेत सादर केला जाणार आहे. आज कृतिदलाच्या सदस्यांची बैठक महापालिकेत झाली. महापौर नयना घोलप यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी आयुक्त भास्कर सानप, उपमहापौर प्रा. देवयानी फरांदे, विरोधी पक्षनेत्या डॉ. हेमलता पाटील, गुरुमितसिंग बग्गा, भगवान भोगे, डॉ. ममता पाटील, अधीक्षक अभियंता रमेश पवार, शहर अभियंता गौतम पगारे, आरोग्य अधिकारी डॉ. कोंडिराम पवार उपस्थित होते.

शहरातील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी आणि पावसाळी पाणी, पर्यावरण अशा विविध विषयांच्या अनुषंगाने येत्या सप्टेंबरपर्यंत नाशिक महापालिकेतर्फे आराखडा तयार करून तो केंद्र शासनाला सादर करण्यात येणार आहे. केंद्र शासन त्यास अनुदान देईल किंवा नाही हे निश्चित नाही. मात्र, या आराखड्याच्या मंजुरीनंतर छोटे-छोटे वेगळे प्रकल्प अहवाल तयार करून त्यानुसार शहरातील भविष्यकालीन गरजांचा विचार करून ते अमलात आणण्यात येणार आहेत, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

या वेळी सल्लागार संस्थेचे प्रतिनिधी रमण्णा, जितेंद्र यादव, महेश हरहरे व सुप्रिया सहाय यांनी शहरातील आराखड्याचे नियोजन व त्यात समाविष्ट विषयांची माहिती दिली. महापालिकेच्या अस्तित्वातील यंत्रणामधील त्रुटींचा या निमित्ताने आढावा घ्यावा, नदीपात्रातील प्रदूषण रोखावे, कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या जागांचा शोध, कचरा वेचकांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे, घरोघरी कचऱ्यांचे वर्गीकरण करणे, तसेच व्यापक विषयांसाठी कृतिदलाचे उपगट तयार करणे, अशा विविध सूचना उपस्थित सदस्यांनी केल्या.

या वेळी उद्योजक लोकेश शेवडे, प्राचार्य आशा वेळूकर, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक [illegible] जयसिंग पाटील, मिलिंद देशमुख, तुषार चव्हाण, राजेंद्र आहिरे, 'सकाळ'चे संजय पाठक, कार्यकारी अभियंता एस. एस. मगरे यांच्यासह अन्य सदस्य, तसेच कार्यकारी अभियंता उत्तम पवार, डी. आर. चव्हाण, पी. एम. गायकवाड आदी उपस्थित होते.



राजीव गांधी भवन : 'जीटीझेड' प्रकल्पासाठी स्थापन झालेल्या कृती दलाच्या पहिल्या बैठकीप्रसंगी दीपप्रज्वलन करताना महापौर नयना घोलप. शेजारी उपमहापौर प्रा. देवयानी फरांदे, महापालिका आयुक्त भास्कर सानप, विरोधी पक्षनेत्या डॉ. हेमलता पाटील, डॉ. ममता पाटील, गुरुमित बग्गा, भगवान भोगे, आरोग्याधिकारी डॉ. कोंडिराम पवार, शहर अभियंता गौतम पगारे, अधीक्षक अभियंता रमेश पवार.

DAILY : DESHDOOT, 19/08/2010, NASHIK

# शहर स्वच्छता टास्क फोर्सची स्थापना

नाशिक, दि.१८ (प्रतिनिधी) - शहरातील स्वच्छता आराखडा तयार करण्यासाठी शहर स्वच्छता टास्क फोर्सची आज (दि.१८) महापौरांच्या उपस्थितीत स्थापना करण्यात आली.



भारत सरकारने शहर सुधारणा योजनेअंतर्गत २००८ साली राष्ट्रीय नागरी स्वच्छता धोरण तयार केले आहे. या धोरणाअंतर्गत नाशिक शहर स्वच्छता टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे. याच्या अध्यक्षस्थानी महापौर तर सचिवपदावर महापालिका आयुक्त असतील. या टास्क फोर्समध्ये उपमहापौर प्रा. देवयानी फरांदे, विरोधी पक्षनेत्या डॉ. हेमलता पाटील, स्थायी समिती सभापती संजय साबळे आदींसह सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकारांचा समावेश आहे.

भारत सरकारच्या नागरी विकास मंत्रालयाने नाशिक शहराचा आराखडा तयार करण्यासाठी जीटीझेड या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. याअंतर्गत शहरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, कचरा, मलनिस्सारण, हागणदारीमुक्त शहर आणि इतर स्वच्छताविषयक बाबींचा अंतर्भाव असणार आहे. महापौरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीस प्रारंभ झाला. यावेळी जीटीझेड आणि आयएमसीएस या संस्थांचे प्रतिनिधींनी राष्ट्रीय स्वच्छता धोरण आणि नाशिक शहरातील विविध स्वच्छताविषयक बाबींबाबत सादरीकरण केले.

या बैठकीस भगवान भोगे, गुरुमित बग्गा, ममता पाटील, प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे जे.एच.पाटील, उद्योजक लोकेश शेवडे, मिलिंद बाबर, निमाचे प्रतिनिधी देशमुख, तुषार चव्हाण, राजेंद्र आहिरे, अधीक्षक अभियंता आर.के.पवार उपस्थित होते. तर जीटीझेडचे रमण्णा, जितेंद्र यादव, आयएम एसीएसचे महेश हरहरे, सुप्रिया सहाय आदी उपस्थित होते.